



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३१२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.२३ जून २०२५

## राजस्थानच्या राज्यपालांचा ताफा अडवला, छत्रपती संभाजीनगरमध्ये राडा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमध्ये संजय नगर या परिसरात आज मोठा राडा झालेला बघायला मिळाला. छत्रपती संभाजीनगर महापालिकेने संजय नगर येथील अतिक्रमण हटवण्याची कारवाई केली. यामुळे तेथील नागरीक चांगलेच संतापले. नागरिकांनी या गोष्टीला विरोध केला. या कारवाईनंतर माजी खासदार इम्तियाज जलील तेथील नागरिकांच्या भेटीसाठी गेले. यावेळी तिथे नागरिकांनी गर्दी केलेली होती. याचवेळी परिसरातून भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा ताफा तेथून जात होता. पण नागरिकांनी हरिभाऊ बागडे यांचा ताफा अडवला. सुदैवाने राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या ताफ्यावर संतापलेल्या नागरिकांनी आगळीक केली नाही. शेवटी सुरक्षा अधिकाऱ्यांनी गर्दीतून ताफा कसातरी



बाहेर काढला.

इम्तियाज जलील यांनी अतिक्रम णाच्या कारवाईवर टीका केली. नियम पाळून कारवाई झाली असती तर आम चं काही म्हणणं नव्हतं. अतिक्रमण पावसाळ्यात काढता येत नाही, असे सुप्रीम कोर्टाने आदेश दिले आहेत. पण आपण सुप्रीम कोर्टपेक्षा मोठे झालो. तुम्ही नियम पाळा आम्ही नियम पाळतो, असं इम्तियाज जलील म्हणाले.

भाजपच्या नेत्याने (संजय केणेकर) एका अधिकाऱ्याला सांगितलं सगळं जमीनदोस्त करून टाका. मग प्रशासन नियमाप्रमाणे काम करणार की नेत्यांच्या मनाप्रमाणे काम करणार? एक नेता म्हणतो ऋखठ करा, दुसरा म्हणतो सगळं पडून टाका, काही नियम तुमच्यासाठी नाही का?, असा सवाल जलील यांनी केला.

जाधव मांडीमध्ये अनधिकृत बांधकाम सुरू आहे. ही कारवाई केली तशी तिथे करू शकता. मात्र तिथे मोठे नेते आहेत म्हणून कारवाई होत नाही. त्यांना नोटीस देता मग इथल्या लोकांना नोटीस द्यायला पाहजे होती. महानगर पालिकेला प्रश्न आहे, पैठण गेट ते गुलमंडी पर्यंत पार्किंग कुठे आहे? बेकायदा दुकाने थाटले. शहागंज ते सिटी चौकपर्यंत कुठे आहे पार्किंग? फक्त गोरगरीब लोक राहतात तिथे कारवाई होते. आता कोणत्याच नेत्याला वेळ नाही. निवडणुकीच्या काळात मतं म ागायला येतात, अशी टीका इम्तियाज जलील यांनी केली.

या अतिक्रमणाच्या कारवाईत राजकारण आहे. एका आमदाराने सांगितले तर सगळं पाडून टाकता. मग मनपा आयुक्तलय, पोलीस स्टेशन सगळं बंद करून नेत्यांच्या कार्यालयात जाऊन बसा तुम्ही. त्यांचं ऐका, असं इम्तियाज जलील म्हणाले.

## अपंग, घटस्फोटीत, परित्यक्त प्रमाणपत्राची तपासणी करा

### जिल्हा परिषद शिक्षणाधिकार्यांचे गटशिक्षणाधिकार्यांना आदेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील अंतर्गत बदली प्रक्रियेतून सुटका व्हावी अथवा सोय व्हावी यासाठी अपंगत्व प्रमाणपत्र, घटस्फोट, परित्यक्त बाबत बोगस कागदपत्रे रंगवणार्या प्राथमिक शिक्षकांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्याचे आदेश शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकार्यांना दिले आहेत. त्यानुसार, बदलीसाठी संवर्ग-१ मधून अर्ज केलेल्या व घटस्फोटीत, परित्यक्त प्रमाणपत्र सादर केलेल्या शिक्षकांची पुन्हा चौकशी होणार आहे.

शिक्षकांच्या जिल्ह्यातील अंतर्गत बदलीसाठी असलेल्या संवर्ग-१ व घटस्फोटीत, परित्यक्त सवलतीचा लाभ घेणार्या शिक्षकांच्या प्रमाणपत्राच्या चौकशीबाबत ग्रामविकास विभागाच्या आदेशानंतर आता जिल्हा परिषद प्राथमि क शिक्षण विभागाने पुढील कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला आहे.

यासाठी शिक्षणाधिकारी पाटील यांनी स्वतंत्र आदेश काढत जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी यांना सांगितले आहे की, त्यांच्या तालुक्यात ज्या शिक्षकांच्या अपंगत्व प्रमाणपत्राबाबत साशंकता आहे, अशा सर्व शिक्षकांची जिल्हा शल्यचिकित्सकांच्या मार्फत पुन्हा तपासणी करण्यात यावी. संबंधितांच्या अपंग प्रमाणपत्राची ऑनलाइन यूडी-आयडी प्रमाणपत्राची तपासणी नेमण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

त्यानुसार आता गटशिक्षणाधिकारी प्रत्येक तालुक्यात विशेष संवर्ग-१ म धून बदलीसाठी अर्ज करणार्या, तसेच घटस्फोटीत-परित्यक्त शिक्षकांच्या न्यायालयाने मंजूर केलेल्या घटस्फोटाच्या प्रमाणपत्राची प्रत, शिक्षिकेने ती पतीसोबत राहत नसल्याचे सादर केलेले स्वयंघोषणापत्र, त्यांच्या रहिवासी दाखले, आधारकार्ड, शिधापत्रिका आदिची पडताळणी करण्यासोबतच त्या राहत असलेल्या ठिकाणी समक्ष भेटी देऊन पाहणी करणार आहेत. यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांच्या पोटात गोळा आला आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज परिक्रमा ; भारत गौरव पर्यटन रेल्वेची पहिली फेरी पूर्ण

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२२, ठाणे :** छत्रपती शिवाजी म हाराज यांचा महापराक्रम आणि जाज्वल्य इतिहासाला समर्पित 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' अर्थात परिक्रमेसाठी भारत गौरव पर्यटन रेल्वेची पहिली फेरी नुकतीच पूर्ण झाली. या सहा दिवसांच्या प्रवासात या विशेष रेल्वेच्या पर्यटक प्रवाशांना शिवप्रताप स्थळांच्या दर्शनाची पर्वणी लुटता आली. ही परिक्रमा शिवछत्रपतींना अभिवादनाची संधी देणारी संस्मरणीय अनुभूती असल्याचे सांगत, पर्यटक प्रवाशांनी रेल्वे मंत्रालय, महाराष्ट्र शासन आणि आयआरसीटिसी च्या या संयुक्त उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले.

भारत गौरव पर्यटन रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ९ ते १४ जून या दरम्यानची पहिली फेरी नुकतीच पूर्ण केली. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले. 'शिवछत्रपतींचा गौरवशाली इतिहास, महाराष्ट्राचा जाज्वल्य अभिमान जागवणाऱ्या या उपक्रमाला पर्यटक प्रवाशांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. महाराष्ट्र शासनाच्या या संकल्पनेला केंद्रीय रेल्वे आणि आयआरसीटीसी ने उत्स्फूर्त आणि सकारात्मक रित्या साकार केले आहे. यात सहभागी सर्व यंत्रणा आणि त्यातील अधिकारी- कर्मचाऱ्यांनीही चोख जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत, या सर्वांचे प्रयत्न देखील प्रशंसनीय आहेत. भारत गौरव रेल्वेच्या माध्यमातून भारतीय संस्कृती आणि आपला जाज्वल्य इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहचवण्याचा




प्रयत्न महत्वाचा आहे. या आणि अशा अनेक उपक्रम-.प्रयत्नात महाराष्ट्र यापुढेही सदैव सज्ज आणि अग्रभारी राहील, अशी ग्वाहीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे. अशा आशयाचे पत्र मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय मंत्री वैष्णव यांना पाठविले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज सर्किट - भारत गौरव पर्यटन रेल्वेला शिवाराज्याभिषेक दिनी (९ जून) रोजी मुंबई येथून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रवाना केले होते. त्यानंतर या विशेष रेल्वेने रायगड, पुणे- कसबा गणपती, लाल महाल आणि शिवसृष्टी, भिमाशंकर ज्योतिर्लिंग, शिवनेरी, प्रतापगड, कोल्हापूर- महालक्ष्मी मंदिर, पन्हाळा आणि परत मुंबई असा प्रवास पूर्ण केला. मुंबईतून रवाना झाल्यानंतर रेल्वेने पहिला थांबा माणगांव (जि. रायगड) येथे घेतला. येथून पर्यटकांना विशेष बसद्वारा स्वराज्याची राजधानी रायगडकडे येथे घेऊन जाण्यात आले. काही प्रवाशांना रोप वे तून, तर काही प्रवाशी पायी चालत रायगडावर पोहचले. याठिकाणी या पर्यटकांना शिवराज्याभिषेक सोहळ्याचे क्षण आणि उत्साह अनुभवता आला. माणगांव-रायगड येथून रात्रीचा प्रवास करून दुसऱ्या दिवशी पर्यटक रेल्वे पुणे रेल्वे स्टेशन येथे पोहचली. येथून पर्यटकांना शिवसृष्टी, शिव पराक्रमाचा साक्षीदार लाल महाल, आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब महाराजांनी स्थापना केलेल्या मानाचा गणपती कसबा गणपती यांचे दर्शन घेता आले.


तिसऱ्या दिवशी पुण्यातून पर्यटकांना छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्म स्थळ किल्ले शिवनेरी आणि परिसराचे दर्शन घडवून आणण्यात आले. त्यानंतर पर्यटकांची बारा ज्योतिर्लिंगापैकी एक भीमाशंकर मंदिरात दर्शनाची व्यवस्था करण्यात आली. चौथ्या दिवशी सकाळी रेल्वे पुणे येथून सातारा कडे रवाना झाली. पाचव्या दिवशी सातारा येथे आगमन आणि पुढे प्रतागगड येथे शिवप्रतापाचा साक्षीदार आणि शिवछत्रपतींनी बांधलेल्या गडाचे दर्शन घडवण्यात आले. यात गडावरील तुळजाभवानी मंदिर आणि परिसराची माहिती पर्यटकांना दिली गेली. या प्रवासात सह्याद्री पर्वत रांगामधील निसर्ग संपदेचा आणि विविध स्थळांच्या विलोभनीय दर्शनाचा आनंदही पर्यटकांना मनमुरादपणे घेता आला. सातारा येथून रात्री रेल्वे सहाव्या दिवसाच्या प्रवासासाठी कोल्हापूरला रवाना झाली. सहाव्या दिवशी कोल्हापूर येथे आगमनानंतर श्री महालक्ष्मी मंदिर परिसरास भेट आणि श्री दर्शन. त्यानंतर पन्हाळगडास भेट, याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांनी उभ्या केलेल्या विविध वास्तूंसह, पन्हाळगड वेढ्यातून सूटका, महापराक्रमी बाजी प्रभू देशपांडे आणि वीर शिवा काशिद स्मारक आदी स्थळांची माहिती देण्यात आली. सहाव्या दिवशी सायंकाळी हे सर्व पर्यटक कोल्हापूर येथून मुंबईकडे परतले.

सहा दिवस आणि पाच रात्रींच्या या प्रवासात या पर्यटक प्रवाशांच्या निवास, चहा, नाष्टा आणि भोजन, स्थानिक प्रवास यांचीही चोख व्यवस्था करण्यात आली होती. प्रवासातील या सर्व ठिकाणी स्थानिक प्रशासन आणि पर्यटन क्षेत्रातील घटकांनी पर्यटक प्रवाशांचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. या पर्यटकांना छत्रपती शिवाजी महाराज यांचा पदस्पर्श, पराक्रम ाने पावन झालेल्या परिसरांची, स्थळांची प्रेरक माहिती मिळावी यासाठी तज्ञ गाईडस् यांची व्यवस्था करण्यात आली. यामुळे या पर्यटक प्रवाशांनी भारत पर्यटन गौरव रेल्वेचे आणि या उपक्रमाचे तोंड भरून कौतुक केले. आयआरसीटिसी कडे तशा प्रतिक्रियाही त्यांनी उत्स्फुर्तपणे नोंदवल्या.

## थोडक्यात

### मांडवे खुर्द येथे बुधवारी रेशनकार्ड कॅम्पचे आयोजन खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचा अनोखा उपक्रम

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटात शासनाची प्रत्येक योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचावी त्यासाठी निलेश लंके प्रतिष्ठानचे पारनेर तालुका अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांच्या संकल्पनेतून निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने रेशनकार्ड कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील विविध गावांमध्ये आपली सेवा आपल्याच दारी हा अभिनव उपक्रम सुरू आहे. या उपक्रमासाठी सर्वसामान्य जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. बुधवार दि. २५ जून रोजी सकाळी ९ वाजता दिपक अण्णा लंके यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून मांडवे खुर्द येथील येथील ग्रामस्थांसाठी विशेष कॅम्प होणार आहे. या आधीच्या खडकवाडी येथील रेशनकार्ड कॅम्पसाठी देखील ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे.

दरम्यान या कॅम्पमध्ये नवीन रेशनकार्ड काढणे, रेशनकार्ड ऑनलाईन करणे, आधार कार्ड अपडेट करणे, बांधकाम कामगार कार्ड काढणे, नवीन मतदार नाव नोंदणी करणे, विविध प्रकारचे दाखले, रेशनकार्ड वरील नाव कमी करणे व दुरूस्ती करणे आदि सेवा दिली जाणार आहे. मात्र यासाठी वारंवार तहसील कार्यालयात जाऊन उंबरठे झिजवावे लागतात. मात्र एका हेलपाट्यात काम होईल ही गॅरंटी देखील नसते मात्र विनाकारण एक दिवस वाया जातो. मात्र बाळासाहेब खिलारी यांनी टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील गावात कॅम्प राबवून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच या कॅम्पमध्ये एकाच ठिकाणी सर्व कामे करून मिळणार आहे.

या कॅम्पमध्ये आतापर्यंत हजारांहून अधिक लाभार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. तसेच या कॅम्पला अक्षरशः महिला, पुरूष तसेच ज्येष्ठ नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. कॅम्पसाठी स्वयंसेवक मदत करत आहे. निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांच्या संकल्पनेतून गावोगावी कॅम्प राबवत असल्याने त्यांचं सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

### जनतेचं वाटोळं करण्यासाठी नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढवू नये...

**अक्षराज : रमेश पंडित**



**दि.२२, हिमायतनगर :** मागील पाच वर्षा पासून जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिकेच्या निवडणूका झाल्याच नाही. तेव्हापासून त्याठिकाणी प्रशासकीय राज असल्याचे बघायला मिळते. नुकतेच सर्वोच न्यायालयाने सहा महिण्यात निवडणुका घेण्याचे आदेश दिल्याने प्रभागरचना करण्याचे आदेश निवडणुक आयोगाने दिले आहेत. तसेच ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण जाहीर झाले आहे. त्यामुळे महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत निवडणुक लढवू इच्छीत असणारे उमेदवारांनी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कोणत्याही क्षणी जाहीर होण्याची शक्यता असल्याने इच्छुक उमेदवार आपआपल्या पक्षाच्या नेतृत्वाकडे मीच कसा योग्य उमेदवार असू शकतो यासाठी फिल्डिंग लावतानाचे चित्र स्पष्ट दिसून येत आहे. त्याचबरोबर गल्लीबोळांमध्ये कोण व्यक्ती योग्य राहील व कोणत्या व्यक्तीने संस्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढवू नये याची चर्चा शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातील चावडींमध्ये चर्चा रंगताना दिसून येत आहे.

आज पर्यंत जेव्हा जेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या त्या-त्या निवडणूक जिंकलेल्या मोजक्याच उमेदवारांनी जनतेच्या हिताची कामे केली. त्यापेक्षा निवडणूक जिंकलेल जास्त उमेदवारांनी जनतेच्या कामापेक्षा स्वेता:चचं भल कसं करता येईल याकडेच लक्ष दिल्याचे दिसून देते. कारण देशाला स्वातंत्र्य मिळून पंचाहत्तर वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटला तरी देखील देशातील मुलभूत गरजा आपण भागवू शकलो नाही.

आज घडील भारत देशाचा लेखाजोखा बघीतला तर येथील व्यवस्थेत बदल झाल्याचे दिसून येत नाही. मोठ्या शहरांकडे बघीतलं तर नाल्या तुडूंब भरून वाहत असून सगळीकडे दुर्गंधी पसरलेली दिसेल. त्याचबरोबर वायू प्रदुषणामध्ये झपाट्याने वाढ होताना दिसून येते. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या देखरेखीखाली जे नागरीकांना ये-जा करण्यासाठी चांगल्या दर्जाच्या रस्त्याच्या नावाखाली रस्त्यांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचा देखील नेहमीच आरोप होत आहे. अशा तक्रारी देखील संबंधीत विभागाकडे केल्या जात आहेत. परंतू त्या तक्रारींच पुढे काय होत याचा अंदाज कोणालाच येत नाही. वास्तविक पाहता हम सब मिल बाटके खायेंगे अशी परिस्थिती बघायला मिळते. एकंदरीतच सगळीकडे विकासाच्या नावाखाली बोंबाबोंब चालू आहे असे उचित ठरते. त्याच बरोबर जनतेच वाटोळ करण्यासाठी नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवू नये अशी चर्चा नागरीकामध्ये होताना दिसून येत आहे. त्याचबरोबर निवडणूक जिंकून बक्कळ पैसा कसा कमावता येईल असा एक मोठा वर्ग बघायला मिळतो असाही मतप्रवाह अनेक जाणकार नागरीकांमध्ये चर्चेचा विषय बनला आहे. एकंदरीतच निवडणूक जिंकून येणे हे जनतेच्या हिताचे कामे नसून यामाध्यमातून एक व्यवसाय म्हणून राजकारणी लोकं निवडणूक लढवतात.




## भारतीय संघ इतिहास घडवेल ?

भारताच युवा क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला असून तिथे दोन्ही देशात पाच कसोटींची मालिका होणार आहे. या मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यास २० जून पासून सुरुवातही झाली आहे. पहिल्या कसोटीच्या पहिल्या दिवशी भारतीय फलंदाजांनी चांगली कामगिरी करत ३०० च्या वर धावा काढल्या त्याही फक्त तीन गडी गमावून. पहिल्याच दिवशी भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वाल आणि नवनियुक्त कर्णधार शुभमन गिल यांनी शतके झळकावली. उपकर्णधार ऋषभ पंतने अर्धशतक झळकावले. दोघेही पहिल्या दिवशी नाबाद असल्याने दुसऱ्या दिवशी त्यांच्या धावात भरच पडेल कदाचित शतकाचे द्विशतकात आणि अर्धशतकाचे शतकात रूपांतर झाले असेल. असो या आव्हानात्मक आणि दीर्घ दौऱ्याची सुरुवात तर चांगली झाली या बद्दल या युवा खेळाडूंचे अभिनंदन करायला हवे. मी या संघाला युवा संघ असे म्हणतो कारण या संघातील सर्वच खेळाडू युवा आहेत. बुमरा, करून नायर आणि के एल राहुल सोडल्यास सर्व खेळाडू तिशीच्या आतील आहेत. या खेळाडूंना कसोटी सामने खेळण्याचा अनुभव कमी आहे. काही खेळाडू तर पहिल्यांदाच इंग्लंडमध्ये खेळत आहेत. इंग्लंडमध्ये खेळणे हे नेहमीच आव्हानात्मक असते कारण तेथील स्विंग होणाऱ्या चेंडूसमोर भल्या भल्या फलंदाजांचा निभाव लागत नाही. त्यात तेथील हवामान बेभरवशाचे आहे. क्षणात ऊन तर क्षणात पाऊस पडत असल्याने खेळपट्टी नेहमी आपला रंग बदलत असते. शिवाय इंग्लंडच्या खेळपट्टीवर भारताची कामगिरी नेहमीच निराशाजनक राहिली आहे. भारताने इंग्लंडमध्ये शेवटचा मालिका विजय १८ वर्षापूर्वी म्हणजे २००७ साली राहुल द्रविडच्या नेतृत्वाखाली मिळवला होता. त्यानंतर अनेकदा भारताने इंग्लंडचा दौरा केला मात्र भारताला इंग्लंडमध्ये मालिका विजय मिळवता आला नाही. महेंद्रसिंग धोनी, विराट कोहली, रोहित शर्मा यांच्या नेतृत्वाखाली भारताने इंग्लंडमध्ये कसोटी मालिका खेळल्या. मालिकेत एखादा दुसरा विजय जरूर मिळाला पण भारताला मालिका खिशात घालता आली नाही. या अठरा वर्षात भारतीय संघात अनेक दिग्गज खेळाडू येऊन गेले. त्यांनी स्वतः च्या धावांच्या राशी उभारल्या, विक्रमांचे इमले रचले पण सांघिक कामगिरी करून इंग्लंडमध्ये मालिका विजय मिळवण्याचा चमत्कार त्यांना करता आला नाही. हा चमत्कार शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील हा युवा संघ करू शकेल का ? असा प्रश्न क्रिकेट विश्वात विचारला जात आहे. याचे उत्तर प्रथम दर्शनी नाही असेच देतील कारण हा भारताचा हा संघ युवा आणि अननुभवी आहे. इंग्लंड संघापुढे यांचा निभाव लागणार नाही असेच सर्वांना वाटते मात्र या युवा खेळाडूंनी स्वतःच्या क्षमतेने खेळ केला, आपल्या नैसर्गिक गुणवत्तेला न्याय दिला आणि मागील इतिहास विसरून संघ म्हणून एकजुटीने खेळ केल्यास हा संघ इंग्लंडला हरवून इतिहास घडवू शकतो. तशी क्षमता या संघात निश्चित आहे. या युवा खेळाडूंमध्ये जोश आहे. पण केवळ जोश असून उपयोग नाही. जोश सोबतच होशही असावा लागतो. कसोटी सामना जिंकण्यासाठी संयम खूप महत्वाचा आहे. टी २० प्रमाणे चौकार षटकार मारून धावा इथे निघत नाही. इथे संयम खूप महत्वाचा आहे. या खेळाडूंनी संयमाने फलंदाजी करून मोठी धावसंख्या उभारली आणि गोलंदाजांनी इंग्लंडचे वीस फलंदाज बाद करण्यावर भर दिला तर हा संघ इंग्लंडला निश्चितच आश्चर्याचा धक्का देऊ शकतो. अर्थात यावेळचा इंग्लंडचा संघही पूर्वीतका बलवान नाही. कर्णधार बेन स्टोक्स व ज्यो रूट वगळता त्यांचा एकही फलंदाज नावाजलेला नाही. त्यांची गोलंदाजीही आता पूर्वी इतकी घातक राहिली नाही. जेम्स अँडरसन आणि स्टुअर्ट ब्रॉड यांच्या निवृत्तीनंतर त्यांची जागा घेणारा एकही गोलंदाज त्यांना मिळाला नाही. मार्क वूड आणि जोफ्रा आर्चर हे त्यांचे मुख्य वेगवान गोलंदाज दुखापतींने ग्रासले आहेत. ते किती कसोटी खेळतील हे खुद्द ते ही सांगू शकणार नाही. त्यांचा फिरकी गोलंदाजही नवखा आहे त्यामानाने आपली गोलंदाजी खूप चांगली आहे. जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा भारताच्या ताफ्यात आहे तो तीन कसोटी खेळणार आहे त्यामुळे या तीन कसोटीत भारताचे पारडे निश्चितच जड राहील. बुमराला सिराज, प्रसिद्ध कृष्णा, अर्शदीप सिंग यांची साथ मिळेल. जडेजा, कुलदीप यादव हे जागतिक स्तरावर नावाजलेले फिरकी गोलंदाज भारताच्या ताफ्यात आहे. नितीश रेड्डी आणि शार्दुल ठाकूर हे अष्टपैलू खेळ करण्यात माहीर आहेत त्यामुळे हा संघ जरी नवोदित, युवा खेळाडूंचा असला तरी त्यांनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर हा संघही इतिहास घडवू शकतो यात शंका नाही. इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाला मालिका विजयासाठी मनापासून शुभेच्छा!

# विधवा भगिनींना उजळमाथ्यांनी जगू द्या!

विधवांना त्यांचे हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने २३ जून हा दिन आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तेव्हा जाणून घेऊया काय आहे विधवा दिनाचा इतिहास, महत्व आणि उद्देश याबाबतची माहिती. काय आहे विधवा दिनाचा इतिहास? कोणत्याही स्त्रिला आपल्या जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे. मात्र काही कारणास्तव त्यांचा जोडीदार गमावल्याने अशा महिलांना एकाकी आयुष्य जगावे लागते. त्यामुळे विधवा महिलांचे प्रश्न मोठे भयंकर आहेत. विधवा महिलांचा प्रश्न फक्त भारतातच नाही, तर जगभरात गंभीर होत चालला आहे. त्यासाठी गेल्या सात वर्षापासून यूकेची लूम्बा फाउंडेशन ही संस्था जगभरातील विधवा महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात संयुक्त राष्ट्रांमध्ये मोहीम राबवत आहे. विधवांचे प्रश्न बिकट झाल्याने संयुक्त राष्ट्र संघाने २३ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

काय आहे विधवा दिन साजरा करण्याचा उद्देश? जागतिक पातळीवर विधवा महिलांचे प्रश्न भयंकर असल्याने संयुक्त राष्ट्राने २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिन साजरा करण्याचे जाहीर केले. त्यानुसार दरवर्षी विधवा दिनाचे औचित्य साधून या दिवशी विधवा महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. जगभरातील विधवा महिलांची स्थिती सुधारावी, त्यांना इतर महिलांसारखे सामान्य जीवन जगता यावे यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात येतात. इतर सामान्य महिलांसारखे त्यांना समान हक्क मिळण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ प्रयत्न करते. मात्र आपण कितीही प्रगत झालो, तरी विधवा महिलांकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन बदलत नाही. जागतिकीकृत पातळीवर विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पती नसल्याने कुटूंब त्यांच्याकडे विशेष लक्ष देत नाही. तर



**– संकलन व सुलेखन –**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअॅप– ९४२३७१४८८३.**

कधी विधवा महिलांना वाऱ्यावर सोडले जाते. यामुळे जगभरातील लाखो विधवा महिला गरिबी, हिंसाचार, बहिष्कार, बेघरपणा, आजारी आणि समाजातील भेदभाव सहन करतात. विधवाविवाहास आपण सर्वपरीने प्रोत्साहन आणि आटोकाट प्रयत्न केले पाहिजे. जगभरातील ११५ दशलक्ष विधवांना गरिबीत जगण्यास भाग पाडले जाते. तर ८१ दशलक्ष महिलांना शारीरिक शोषणाचा सामना करावा लागत असल्याचे विविध अहवालातून स्पष्ट झाले आहे. जागतिक पातळीवर विधवा महिलांच्या न्याय हक्काचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यात भारतातही विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. भारतात चार कोटींहून अधिक विधवा महिला आहेत. आजही विधवा महिला त्यांच्या हक्कापासून वंचित आहेत. या विधवा महिलांना पती नसल्याने मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. एक उदाहरण आहे– जोवेरिया नाबुकेन्या एक विधवा, इसिंगिरो जिल्ह्यात तिच्या काही ८ नातवंडांसोबत वाचते. युनिसेफच्या पाठिंब्याने नाबुकेन्या मुख्य कौटुंबिक काळजी प्रॅक्टिसेसवर आहेत. तिची एक दिनचर्या आहे जिथे ती मुलांसोबत वाचते आणि ते शिकत असताना त्यांच्यासोबत खेळते.

जगभरातील बऱ्याच महिलांसाठी, त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी आणि प्रतिष्ठेसाठी दीर्घकालीन लढ्याने जोडीदाराचा विनाशकारी तोटा वाढविला जातो. जगभरात २५८ दशलक्षाहून अधिक विधवा असूनही, विधवांना ऐतिहासिकदृष्ट्या आपल्या समाजात न पाहिलेले, समर्थन न मिळालेले आणि मोजले गेलेले नाही. भूतकाळातील अनुभव दर्शवितो, की विधवांना अनेकदा वारसा हक्क नाकारले जातात, जोडीदाराच्या मृत्यूनंतर त्यांची मालमत्ता बळकावली जाते आणि रोगाचे 'वाहक' म्हणून त्यांना अत्यंत कलंक आणि भेदभावाचा सामना करावा लागतो. जगभरात, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना वृद्धापकाळ निवृत्तीवेतन मिळण्याची शक्यता खूपच कमी आहे, म्हणून जोडीदाराच्या मृत्यूमुळे वृद्ध स्त्रियांना निराधारपणा येऊ शकतो. लॉकडाऊन आणि आर्थिक बंदच्या संदर्भात विधवांना ते खूप आजारी पडल्यास किंवा स्वतःला आणि त्यांच्या मुलांचे पालनपोषण करण्यासाठी त्यांना बँक खाती आणि पेन्शन मिळू शकत नाहीत. एकटी–माता कुटुंबे आणि अविवाहित वृद्ध स्त्रिया आधीच विशेषतः गरिबीसाठी असुरक्षित आहेत, हे एक क्षेत्र आहे ज्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय विधवा दिनी जगभरातील विधवांवर परिणाम करणाऱ्या काही समस्या आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि प्रगती करण्यासाठी काय केले पाहिजे यावर एक नजर टाका.

युनायटेड नेशन्स सन २०११पासून २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिवस म्हणून पाळत आहे, विधवांच्या आवाजाकडे आणि त्यांच्या अनुभवांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि त्यांना आवश्यक असलेला अनोखा पाठिंबा मिळवण्यासाठी पाळला पाहिजे. आता पूर्वीपेक्षा अधिक हा दिवस विधवांना पूर्ण हक्क आणि मान्यता प्राप्त करण्याच्या दिशेने कृती करण्याची संधी आहे. यामध्ये त्यांना त्यांचा वारसा, जमीन आणि उत्पादक संसाधनांचा वाजवी वाटा मिळण्याची माहिती प्रदान करणे समाविष्ट आहे; निवृत्तीवेतन आणि सामाजिक संरक्षण जे केवळ वैवाहिक स्थितीवर आधारित नाही; सभ्य काम आणि समान वेतन; आणि शिक्षण आणि प्रशिक्षण संधी. विधवांना स्वतःला आणि त्यांच्या कुटुंबांना आधार देण्यासाठी सक्षम करणे म्हणजे सामाजिक कलंक दूर करणे ज्यामुळे बहिष्कार आणि भेदभाव किंवा हानिकारक प्रथा निर्माण होतात. शिवाय महिलांविरुद्ध सर्व प्रकारचा भेदभाव निर्मूलनाचा करार आणि बालहक्कावरील अधिवेशनासह आंतरराष्ट्रीय कायद्यात नमूद केल्याप्रमाणे विधवांच्या हक्कांची खात्री करण्यासाठी सरकारांनी त्यांच्या वचनबद्धतेचे पालन केले पाहिजे. विधवांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय कायदे अस्तित्वात असतानाही, अनेक राज्यांच्या न्यायिक व्यवस्थेतील कमकुवतपणामुळे विधवांच्या हक्कांचे व्यवहारात संरक्षण कसे केले जाते आणि त्याकडे लक्ष दिले पाहिजे.

न्यायिक अधिकाऱ्यांकडून जागरूकता आणि भेदभावाचा अभाव यामुळे विधवा न्याय व्यवस्थेकडे नुकसान भरपाई मागण्यासाठी वळू शकत नाहीत. शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कृती योजनांच्या संदर्भात विधवा आणि त्यांच्या मुलांवरील हिंसाचार, गरिबी निर्मूलन, शिक्षण आणि सर्व वयोगटातील विधवांना इतर समर्थन यासाठी कार्यक्रम आणि धोरणे देखील हाती घेणे आवश्यक आहे. संघर्षानंतरच्या परिस्थितीत विधवांना शांतता निर्माण आणि सलोखा प्रक्रियांमध्ये पूर्णपणे सहभागी होण्यासाठी आणले पाहिजे जेणेकरून ते शाश्वत शांतता आणि सुरक्षिततेसाठी योगदान देतील आणि कोविड–१९ च्या संदर्भात विधवांना पुन्हा चांगले सक्षम बनवण्यासाठी आमच्या कामातून सोडले जाऊ नये. आमची पुनर्प्राप्ती त्यांच्या अनन्य गरजांना प्राधान्य देते आणि समाजांना अधिक समावेशक, लवचिक आणि सर्वांसाठी समान होण्यासाठी समर्थन देते, याची खात्री करूया.

**!! जागतिक विधवा दिनानिमित्त समस्त विधवा भगिनींना हार्दिक शुभकामना जी !!**

## आडोळी सर्कल मधील पानंद रस्ते कधी होणार?

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, वाशिम :** आडोळी परिसरातील पानंद रस्ताचा विकास कधी होणार ? शेतकऱ्यांना पेरणीच्या वेळेस खत, बि, बियाणे आपला डोक्यावर घेऊन जाउन शेतामध्ये टाकावे लागते व नंतर पेरनी करावी लागते.

अतिशय दयनीय अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे व महीलांना चिखल तुडवत शेतामध्ये जावे लागते निंदन, खुरपन करण्यासाठी नागरिकांमध्ये चर्चा आहे की आमचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी हरवले आहे. मिळवून देणाऱ्याला ईनाम द्यायला पाहिजे. पालक मंत्री, खासदार, आमदार, जि.प.



सदस्य प्रतिनिधी सापडल्यास एक रूपया इनाम देऊ असे महाराष्ट्र शेतकरी नेते राम इढोळे यांनी बोलतांना घोषीत केले.

## सश्रद्ध महाराष्ट्र !

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्याचे म्हटले जाते. पुरोगामीत्व म्हणजे जेथे सर्व गोष्टी विज्ञानाच्या तराजूत मोजल्या जातात, देवभोळेपणा आणि श्रद्धांना येथे स्थान नाही; मात्र याच महाराष्ट्रात साजरा होणारा श्रद्धेचा महाउत्सव म्हणजेच आषाढीची वारी आज गिनीज बुकात नोंदली गेली आहे. आपली सारी व्यावहारिक कामे बाजूला सारून केवळ भगवंताच्या मुखदर्शनासाठी वारकरी पायपीट करत निघतो. या पायपिटीमध्ये तब्येतीची चिंता, खाण्या पिण्याची व्यवस्था, घरच्या पोराबाळांची काळजी सारे काही त्या पांडुरंगावर सोडून वारकरी भगवी पताका घेऊन पंढरीची वाट धरतो आणि तो भक्ताच्या भक्तीच्या भुकेला आसुसलेला पांडुरंगही आपल्या भक्ताची सर्वार्थाने काळजी वाहतो. पांडुरंगाच्या आणि भक्ताच्या अतूट नात्याच्या मिलनोत्सवाला विज्ञानाचे तराजू तोलू शकेल का ? याच महाराष्ट्राच्या नाशिक नगरीत दर १२ वर्षांनी भरणारा सिंहस्थ कुंभमेळा या श्रद्धेचा आणखी एक महोत्सव अशा श्रद्धाळू भक्तांच्या महाराष्ट्राला पुरोगामी महाराष्ट्रापेक्षा 'सश्रद्ध महाराष्ट्र' हेच विशेषण योग्य ठरेल.

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## महामृत्यु..

महा मृत्यूचे तांडव
हृदयांत घुसे फाळ
शोधून काढून नेतो
किती कसेही टाळ

अमृत फक्त पुराणी
कसे किती पिटाळ
मृत्यू स्पर्श शहारतो
त्याला नसे विटाळ

इथून जायचे अटळ
कर्तव्यकठोर काळ
भेद भाव ना त्याला
वृध्द तरुण वा बाळ

मरणचुकणेअशक्य
किती कसे सांभाळ
मातीतअंती मिसळे
जरी खुणवेआभाळ

चूक ही अमक्याची
आपणउठवतो राळ
तुम्ही असे जिम्मेदार
फुके घालतोयआळ

तुटून विखरली जाते
मृत्यूंजयजपात माळ
वाटचाले स्मशानाची
जीवनाचीतुटते नाळ

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे

आज २३ जून, आपल्या मधुर आवाजाने रसिकांच्या हृदयात स्थान मिळवणारे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांचा स्मृतिदिन. प्रल्हाद शिंदे यांना भक्ती गीतांचा बादशहा म्हंटले जाते कारण त्यांनी गायलेली सर्व भक्तिगीते लोकप्रिय झाली. केवळ भक्तिगीते नाही तर भावगीते, कव्वाली आणि कोळी गीतांवर देखील ठसा उलटवला. सर्व प्रकारची लोक गीते गाण्याचा आणि ती लोकगीते लोकप्रिय करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली.

महाराष्ट्रात कोणताही सण उत्सव असो त्यांनी गायलेली गाणी वाजवल्या शिवाय तो सण उत्सव पूर्ण होतच नाही. मग तो गणपती उत्सव असो की नवरात्र उत्सव, आषाढी एकादशी असो की सत्यनारायणाची महापूजा, आंबेडकर जयंती असो की बुद्ध पौर्णिमा इतकेच काही गावातील संदल उरूस देखील त्यांच्या कव्वाली शिवाय पूर्ण होत नाही कारण त्यांनी गायलेली ऐका सत्य नारायणाची कथा, चल ग सखे पंढरीला, बाप्पा मोरया रे, उड जायेगा एक दीन पंछी रहेगा पिंजरा खाली.... अशी गायलेली शेकडो गाणी आजही लोकप्रिय आहे. ही गाणी अजरामर आहेत. ही गाणी ऐकली नाहीत असा एकही माणूस महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वानाच ही गाणी तोंडपाठ आहेत. केवळ हीच नाही तर यासारखी शेकडो लोकप्रिय गाणी गाऊन त्यांनी रसिकांच्या हृदयात स्थान मिळवले आहे. १९३३ साली सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा गावात त्यांचा



झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भगवानराव तर आईचे नाव सोनाबाई असे होते. त्यांना दोन मोठे भाऊ होते. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने प्रल्हाद शिंदे यांचा परिवार ते लहान असतानाच मुंबईत आले. गोड गळ्याची दैवी देणगी लाभलेल्या प्रल्हाद शिंदे यांनी लहान वयातच मुंबईच्या रस्त्यांवर रेल्वे स्टेशनवर गाणी गायला सुरुवात केली. त्यांची आई भाऊही गाणी गाऊन त्यांना साथ देऊ लागली. त्यातून त्यांचा उदरनिर्वाह होऊ लागला. अतिशय गरीब घराण्यात जन्म घेतलेला, बहुजन समाजात जनमलेला, गायनाचे किंवा संगीताचे कोणतेही शिक्षण न घेतलेल्या प्रल्हाद शिंदे यांचा आवाज मुंबईत लोकप्रिय होऊ लागला. त्यांची गाणी जशी लोकप्रिय होऊ लागली तशी त्यांच्या आवाजाची जादू महाराष्ट्रभर पसरू लागली.

गावागावातून त्यांना गाणी गाण्यासाठी बोलावणे येऊ लागले. नवरात्र उत्सव, आंबेडकर जयंती, गावातील यात्रा, जत्रा, बुद्ध पौर्णिमा, संदल – उरूस अशा कार्यक्रमात त्यांना बोलावणे येऊ लागले. त्यांची गाणी ऐकण्यासाठी लोक लांबून लांबून येऊ लागली. पाहता पाहता त्यांचा आवाज महाराष्ट्रभर पसरला. महाराष्ट्रातील ते सर्वाधिक मागणी असलेले गायक बनले. उभ्या महाराष्ट्रात पायाला भिंगरी लावल्यासारखे ते गाण्यासाठी भटकले. त्यामुळे त्यांनी माणसे जोडली आणि ते जाती धर्माच्या पलीकडे जाऊन पोहचले. प्रल्हाद शिंदे आपल्या गाण्याच्या कार्यक्रमाचा शेवट नेहमी एका आगळ्या वेगळ्या गीताने करीत. त्यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. भजन, कीर्तन, लोकगीते, बुद्ध धर्माची गाणी, डॉ बाबासाहेबांची गाणी त्यांनी घराघरात पोहचवली. त्यांची गाणी इतकी लोकप्रिय झाली की लोकांनी त्यांना डोक्यावर घेतले. प्रल्हाद शिंदे यांनी गायनाचा धंदा केला नाही म्हणून त्यांना कधीही आर्थिक स्थैर्य मिळाले नाही पण त्यांच्या गाण्यांमुळे कॅसेट कंपन्या मात्र गब्बर झाल्या. २३ जून २००३ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या गाण्याची परंपरा पुढे आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, चंद्रकांत शिंदे या मुलांनी जपली तीच परंपरा त्यांची नातवंड देखील जपत आहे. आज शिंदे घराणे हे संगीत क्षेत्रातले ब्रँड बनले आहे याचे सर्व श्रेय प्रल्हाद शिंदे यांना जाते. मधुर गळ्याचे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## राजेंद्र विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२१, खंडाळा (सातारा) :** शनिवार दि.२१/०६/२०२५रोजी सकाळी विद्यालयाच्या प्रांगणामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन समारंभ संपन्न झाला. प्रारंभी खंडाळा विभाग शिक्षण समितीचे सचिव आदरणीय अनिरुद्ध गाढवे यांनी योग दिनाच्या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्त्व विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक रतिलाल गावित यांनी सांगितले. सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.प्रतिभा पाटणे यांनी योगा व व्यसनमुक्ती याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना योग मार्गदर्शन करण्यासाठी आर्ट ऑफ लिविंग योग प्रशिक्षक कु.निकिता धायगुडे व शुभांगी नेवसे यांनी योगाची प्रात्यक्षिके घेतली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक धनंजय महामुनी यांनी केले. उपस्थितांचे स्वागत राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख जयप्रकाश गेजगे यांनी केले. कार्यक्रमास संचालक वसंतराव पंडित, राजेंद्र विद्यालयाचे प्राचार्य तुळशीराम खांडे, उपप्राचार्य अरुंधती गाढवे, उपमुख्याध्यापिका सुशीला मोहिते, पर्यवेक्षक धनंजय महामुनी उपस्थित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## वादळी वाऱ्यामुळे उंचेगाव खु. येथील शेतकऱ्याच्या सोलारचे नुकसान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, उंचेगाव (नांदेड) :** दिनांक ९ जून २०२५ रोजी अचानक आलेल्या वादळी वाऱ्याम ुळे उंचेगाव येथील शेतकऱ्यांचे म ोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गावाच्या तुलनेत काही अडथळा नसल्यामुळे शेतामधील वादळाने सुटलेल्या हवेचा वेग मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे ९ जून रोजी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे काही शेतकरी बांधवांच्या झोपड्यावरील पत्रे उडून गेली तर काही शेतकरी बांधवांनी आपल्या शेतात बसवलेल्या सोलार कृषी पंपावरील सोलार पॅनलच्या प्लेट मोडून त्यांचे नुकसान झाले आहे.

त्यापैकीच एक उंचेगाव खुर्द येथील रहिवासी असणारे प्रगतशील शेतकरी गोविंद गणेशराव चंद्रवंशी यांच्या शेत सर्वे क्रमांक ८५/१ मध्ये प्रधानमंत्री कुसुम सोलार योजनेअंतर्गत बसविण्यात आलेल्या सौर कृषी पंप जो की जी. के. एनर्जी. कंपनीचा आहे, त्याच्या पॅनलच्या २ प्लेट वातावरणातील बदलामुळे अचानक सुटलेल्या वादळी वाऱ्यामुळे फुटून गेलेल्या आहेत. झालेल्या नुकसानीची पाहणी सरपंच कांताबाई शिवाजी हेलगंड व गावचे पोलीस पाटील लक्ष्मण मारोती शिंदे यांच्याकडून करण्यात आली आहे. या झालेल्या नुकसानीची भरपाई कंपनीकडून मिळावी अशी मागणी शेतकरी गोविंद चंद्रवंशी यांनी केली आहे.

## सहजयोग परिवार, उलवे –नवी मुंबईकडून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विविध शाळांमध्ये कार्यक्रम



**अक्षराज : चंदन सिंह**

**दि.२१, उलवे (नवी मुंबई) :** आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने सहजयोग परिवार, उलवे - नवी मुंबई यांनी आज दिनांक २१ जून रोजी तीन शाळांमध्ये विशेष योग कार्यक्रमांचे आयोजन केले. या उपक्रमांतर्गत रॅडक्लिफ शाळा, मोरू नारायण पाटील शाळा आणि शकुंतला रामशेठ ठाकूर शाळेमध्ये योग सत्रे घेण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगितले गेले, तसेच सहजयोग ध्यानपद्धतीची ओळख करून देण्यात आली. शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक शांततेसाठी योग किती उपयुक्त आहे, हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवासह समजावले गेले.

सहजयोग साधकांनी विद्यार्थ्यांसमोर प्रत्यक्ष ध्यान व योगाभ्यासाचे सादरीकरण केले आणि त्यांच्या मनातील प्रश्नांनाही उत्तर दिली. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी योग व ध्यानाच्या सकारात्मक अनुभवांबद्दल प्रतिक्रिया दिल्या. या उपक्रमाचे आयोजन सहजयोग परिभाराच्या स्वयंसेवकांनी केले होते आणि शाळा व्यवस्थापनांनीही कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी म ोलाचे सहकार्य केले.

योग ही केवळ शरीराची कसरत नाही, तर आत्मशांती आणि आत्मज्ञान प्राप्त करण्याचा मार्ग आहे, असे मत या प्रसंगी सहजयोग साधकांनी व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला आणि योग दिनाचे खरे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात सहजयोग परिवाराला यश आले.

## राष्ट्रवादी (शप) पक्षाच्या वतीने मोफत दाखले वाटप शिबीर

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२२, ठाणे :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा विधिमंडळ गटनेते आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ठाणे जिल्हा अध्यक्ष सुहास देसाई यांच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्हा असंघटित कामगार सेल अध्यक्ष राजू चापले यांनी चंदनवाडी, ठाणे येथे आयोजित केलेल्या मोफत दाखले वाटप शिबिराचे आयोजन २१ व २२ जून रोजी करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांना ठाणे जिल्हा अध्यक्ष सुहास देसाई यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करत अभिवादन करून सुरुवात करण्यात आली. यावेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन माजी नगरसेवक सुहास देसाई यांनी केले.

याप्रसंगी माजी नगरसेवक मिलिंद बनकर, ठाणे जिल्हा व्यापारी अध्यक्ष संजीव दत्ता, ठाणे जिल्हा ओबीसी अध्यक्ष गजानन चौधरी, ठाणे जिल्हा ज्येष्ठ नागरिक अध्यक्ष दिलीप नाईक, ठाणे जिल्हा प्रशासन सरचिटणीस राजेश साटम, ठाणे शहर उपाध्यक्ष शिवा कालुसिंग, ठाणे शहर युवक उपाध्यक्ष आशिष खाडे यांच्यासह अनेक स्थानिक रहिवाशी उपस्थित होते.

# बालग्राम, येरवडा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

## ॲड.शार्दुलराव सुधाकरराव जाधवर विधी महाविद्यालय, पुणे यांचा उपक्रम



**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.२२, पुणे :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, ॲड. शार्दुलराव सुधाकरराव जाधवर विधी महाविद्यालय, पुणे यांच्या वतीने एसओएस बालग्राम, येरवडा येथे विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राचे मार्गदर्शन योग प्रशिक्षक नेहा नाटेकर यांनी केले.

त्यांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, अनुलोम-विलोम, ध्यानधारणा यांचे योग्य व सहज मार्गदर्शन केले. त्यांच्या दिलखुलास आणि प्रेरणादायी शैलीमुळे उपस्थितांनी आनंदाने सहभाग नोंदवला. या समाजोपयोगी उपक्रमामागे संस्थापक डॉ. सुधाकरराव जाधवर व अध्यक्ष ॲड. शार्दुलराव सुधाकरराव जाधवर यांचे दूरदर्शी मार्गदर्शन व प्रेरणा लाभली. त्यांची शिक्षण हे समाजासाठी ही धारणा या उपक्रमातून प्रत्यक्षात उतरली.

कार्यक्रमाचे नेतृत्व प्राचार्या डॉ. सपना सुकृत देव यांनी केले. त्यांच्याच संकल्पनेतून या उपक्रमाची आखणी झाली. विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला आणि मुलांसोबत संवाद साधून योगाचे महत्त्व समजावले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदनेने झाली. त्यानंतर सामूहिक योग सत्र, श्वसन तंत्र, मौन ध्यान आणि आरोग्य विषयक माहितीपट दाखवण्यात आला.

# योगामुळे शरीर व मनाची शुद्धता : योगाचार्य ठाणगे

## श्री ढोकेश्वर विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात २१ जून हा जागतिक योगदिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी भारतीय सेनेतून सेवानिवृत्त झालेले सुभेदार, योगाचार्य गणपत ठाणगे यांनी विद्यार्थी व शिक्षकांना योगाची माहिती देवून प्रात्यक्षिके करून दाखविली. त्यांनी सांगितले की, महर्षी पतंजली हे योगशास्त्रातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते.

सध्या स्वामी रामदेव बाबा संपूर्ण जगाला योगा व प्राणायामाचे धडे देत आहेत. योगा व प्राणायामामुळे मनुष्य निरोगी राहतो व त्यास दीर्घायुष्य मिळते. म्हणून सर्वांनी सूर्योदयापूर्वी रोज योगा, प्राणायाम व सूर्यनमस्कार करावेत. असा संदेश ठाणगे यांनी सर्वांना दिला.

विद्यालयाचे प्राध्यापक अशोक गांगड यांनी विद्यार्थ्यांना जिम्नॅस्टिक या खेळाबद्दल माहिती देत काही प्रात्यक्षिके करून दाखविली. त्यास विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे दाद दिली.

टाकळी ढोकेश्वरचे माजी सरपंच शिवाजी खिलारी व विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनीही विद्यार्थी व शिक्षकांना जागतिक योगदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका मनीषा गाडगे, मल्हारी वाघस्कर, नीलम खिलारी, रविंद्र ज्योतिक, रविंद्र मते, बाबासाहेब जाधव, नारायण शेळके, संदिप म हांडुळे, अतुल सैद, विष्णू भद्रे, सुनील झावरे, आतिश झावरे, विजय सोबले, राजेंद्र ढोणे , भाऊसाहेब हिंगडे, शिवाजी नरसाळे, मांडगे सर, पोपट जगदाळे, महानवर, वाघ सर, नितीन ढोकळे, शिंदे मॅडम, दिघे मॅडम, खाडे मॅडम, खोसे मॅडम, होरणे भाऊसाहेब, पवन कुटे, अनिता म्हस्के, वैशाली गायखे, सुरेखा ठाणगे, कल्पना जाधव, सुमन वाळुंज, सोनल रोहोकले, प्रिया डव्हणे, अनुष्का कांबळे, वैशाली ढोकळे, सोनाली माळवदे, बांगर सर, धनश्री निवडुंगे, नारायण हरेल, अमोल गोरे, सुनिता घोडके यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिमायतनगर परिसरात पेरणी पूर्ण, पण पावसाचा पत्ता नाही; शेतकरी चिंतेत...



**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.२२, हिमायतनगर :** हिमायतनगर तालुक्यातील तसेच परिसरात यंदाच्या खरिप हंगामासाठी बहुतांश शेतकऱ्यांनी वेळेवर पेरणी पूर्ण केली आहे. मात्र, काही शेतकऱ्यांनी जून महिन्याच्या अखेर तर काही शेतकऱ्यांनी जून महिन्याच्या प्रारंभी पेरणी केली होती. अनेक दिवस उलटूनही समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकरी चिंतेच्या गर्तेत सापडले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून परिसरात उन्हाची तीव्रता वाढली असल्यामुळे पावसाचे आगमन आणखी लांबण्याची शक्यता आहे. हवामानात अचानक बदल होत असून ढगांचा गडगडाटही होत नाही. परिणामी, बियाणे पेरून ठेवलेली जमीन कोरडी राहिली असून पीक उगम घेण्यास अडथळा निर्माण होत आहे.

या स्थितीमुळे शेतकऱ्यांनी केलेली मेहनत, बियाण्यांची गुंतवणूक आणि इतर शेतीसंबंधी खर्च वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही शेतकऱ्यांनी कर्ज घेऊन बी-बियाणे आणि खते खरेदी केली आहेत. पावसाचा उशिर अधिक वाढल्यास उत्पादनात घट येण्याची तसेच आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

हिमायतनगर येथील शेतकरी म्हणाले कि, पेरणी झाली खरी, पण आता पावसाचीच वाट पाहतोय. उगम वेळेवर झाला नाही तर सगळा हंगाम अडचणीत येईल. सध्या हिमायतनगर परिसरातील शेतकऱ्यांच्या नजरा ह्या ढगांकडे लागल्या आहेत .समाधान कारक पावसाच्या अपेक्षेने शेतकरी चिंतातूर आहेत. समाधानकारक पाऊस झाल्यानेच शेतीसाठी पोषक वातावरण निर्माण होईल.

सरकार व हवामान विभागाने वेळोवेळी शेतकऱ्यांना माहिती देऊन दिशा दाखवावी, अशी मागणीही शेतकरी करत आहेत.

# महाबळेश्वर वेण्णा माईची खणा नारळाने नगरपालिकेने ओटी भरली...

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२१, महाबळेश्वर :** महाबळेश्वरमध्ये गेल्या काही दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे म हाबळेश्वरची जलवाहिनी असलेला वेण्णा तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे सांडव्यावरून पाणी वाहू लागले आहे.

महाबळेश्वरची भाग्य लक्ष्मी असलेल्या वेण्णा माईचे जलपुजनाचा कार्यक्रम नगरपालिकेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या हस्ते व माजी नगराध्यक्ष किसनसेठ शिंदे, माजी नगरसेविका विमलताई ओंबळे, शारदा ढाणक, सुरेखा आखाडे, माजी नगरसेवक सुनील शिंदे अर्बन बँक संचालक शरद बावळेकर, रेवणे अण्णा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मुख्य लिपिक आबा ढोबळे, विठ्ठल जाधव, अरुण बावळेकर, ताजू शारवान, लालु पन्हाळकर, बोटमन उमेश रोकडे, जमीर शारवान बासिद डांगे, पत्रकार राहुल शेलार, रियाज मुजावर उपस्थित होते.

वेण्णा तलावावर नगरपालिका बोट क्लब चालविते तसेच येथील जलसाठा महाबळेश्वर, पांचगणी शहरासाठी पिण्याच्या पाण्यासाठी उपयोगात आणला जातो. दरवर्षी पावसाने वेण्णा लेक भरल्या नंतर वेण्णा नदीची खणा नारळाने ओटी भरण्याची परंपरा आहे. वेण्णा लेक भरल्यामुळे रविवारी परंपरे नुसार नगरपालिकेच्या वतीने




वेण्णा तलाव जल पूजन करून वेण्णा माईची ओटी भरण्यात आली.

# जाणीव प्रतिष्ठानकडून दत्तक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२१, शहापूर :** गेल्या १७ वर्षापासून जाणीव प्रतिष्ठान शहापूर तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात सेवाभावी कार्य करणारी संस्था म्हणून कार्यरत आहे. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून दरवर्षीप्रम ाणे या वर्षीही दत्तक विद्यार्थी शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम रविवार २२ जून रोजी जनकल्याण शिक्षण संस्थेचे म. ना. बरोरा माध्यमिक विद्यालय सभागृह, शहापूर येथे ह.भ.प. योगेश महाराज घरत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. आपण ज्या समाजामध्ये राहतो त्या सम ाजाचे आणि त्या मातृभूमीचे आपण काहीतरी देणे लागतो या उदात्त हेतूने जाणीव प्रतिष्ठान मार्फत दत्तक विद्यार्थ्यांना शाळेत स्कूल बॅग, छत्र्या, शालेय रजिस्टर, चित्रकला, हस्तकला वह्या, पेन, पेन्सिल, कंपास व प्रवास भत्त्याचे वाटप प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले. याशिवाय गरीब गरजू आणि होतकरू असलेले तब्बल ४२ विद्यार्थी या प्रतिष्ठानच्या सदस्यांनी दत्तक घेऊन त्यांचे दायित्व स्वीकारल्याचे येथील उपस्थित पालकांनी प्रस्तुत प्रतिनिधींशी बोलतांना सांगितले. जाणीव प्रतिष्ठानची स्थापना २००९ साली प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष अरुण पाटील, आत्ताचे भाजपचे शहापूर विधानसभा पूर्व मंडळाचे अध्यक्ष सुभाष हरड यांनी केली होती. त्यांनी लावलेले हे इवलेसे रोपटे वटवृक्षात रूपांतरित झाल्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष योगेश महाराज यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात वर्णन करत त्यांनी या वटवृक्षाला संजीवनी देण्याच्या उदार हेतूने २१ हजारांचा धनादेश प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना सुपुर्द केला. सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून क्रुगर कंपनीचे जनरल मॅनेजर संपत शेडगे, वासिंद व्यापारी संघटनेचे अध्यक्ष संदीप पाटील, नवधरे अकॅडमीचे विनय नवधरे, प्रहार जनशक्ती पक्षाचे शहापूर तालुका अध्यक्ष वसंत पानसरे, उत्कर्ष पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार मनोहर पाटोळे आदी मान्यवरांसह जाणीव प्रतिष्ठानचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, कार्याध्यक्ष मधुकर हरणे, उपाध्यक्ष डॉ. हरिश्चंद्र भोईर, खजिनदार प्रदीप विशे, सचिव कैलास धानके, सहसचिव भगवान वरकुटे, निवृत्ती दांडकर, माजी अध्यक्ष अरुण पाटील, प्रमोद पाटोळे यांच्यासह जाणीव प्रतिष्ठानचे सर्व सन्माननीय सदस्य, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

अक्षराज
४ | बुलडाणा, सोमवार, दि.२३ जून २०२५ | संमिश्र

# मुंबईत लोकल प्रवासादरम्यान दररोज १० प्रवाशांचा मृत्यू...?

## दुर्घटना रोखण्याचं रेल्वे प्रशासनासमोर आव्हान

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२१, मुंबई :** मुंबईत लोकल प्रवासादरम्यान विविध कारणांनी होणाऱ्या मृत्यूंची संख्या गेल्या १५ वर्षांत ४६ टक्क्यांनी कमी झाल्याचा दावा रेल्वे प्रशासन केला आहे. दिवसाला १० प्रवाशांचा मृत्यू होणे हे चिंताजनक असल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले आहेत. रेल्वे प्रशासनाने यापूर्वी प्रतिज्ञ पत्र दाखल केलं होतं. या प्रतिज्ञापत्रात, लोकल प्रवासादरम्यान होणाऱ्या मृत्यूंची संख्या कमी होत असल्याचा दावा केला होता. त्याचवेळी, २०२४ मध्ये लोकल प्रवासादरम्यान ३५८८ प्रवाशांचा विविध कारणांनी मृत्यू झाल्याची कबुलीही दिली होती. रेल्वे प्रशासनाच्या प्रतिज्ञापत्रातदाव्यांच्या विसंगतीवर मुख्य न्या.आलोक आराधे आणि न्या.संदीप मारणे यांच्या खंडपीठाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच, दिवसाला १० प्रवाशांना लोकल प्रवास करताना जीव गमवावा लागता असेल तर ही चिंताजनक स्थिती आहे.उपनगरीय रेल्वेतील प्रवाशांच्या मृत्यूसंदर्भात पालघरस्थित यतीन जाधव यांनी गेल्या वर्षी जनहित याचिका दाखल केली होती. त्यात मुंबई उपनगरीय रेल्वे प्रवासादरम्यान होणाऱ्या मृत्युचा दर हा ३८.०८ टक्के असल्याचे म्हटले होते. तसेच, जगात हा दर सर्वाधिक असल्याचा दावाही केला गेला होता. न्यायालयानेही या याचिकेची आणि त्यात नमूद केलेल्या आकडेवारीची दखल घेऊन ही लज्जास्पद बाबा असल्याचे ताशेरे ओढले होते.

प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शिफारशी सुचवण्याचसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आल्याची, तर मुंब्रा येथील घटनेच्या चौकशीसाठी शिस्तपालन समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनातर्फे यावेळी न्यायालयाला देण्यात आली. त्यावर लोकसमधील गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सामान्य लोकलला स्वयंचलित दरवाजे का बसवले जात नाहीत, असा प्रश्न देखील न्यायालयाने रेल्वे प्रशासनाला केला.

मुंब्रा घटनेनंतर सामान्य लोकलला स्वयंचलित दरवाजे बसवण्याचा निर्णय रेल्वे मंत्र्यांनी जाहीर केल्याचेही रेल्वे प्रशासनातर्फे न्यायालयालासांगण्यात आले. दरदिवशी किवा दरवर्षी होणाऱ्या मृत्यूची संख्या लक्षात घेता समितीने तातडीने उपाययोजना सुचवाव्यात.



या उपाययोजना काय असतील आणि या उपाययोजना कधीपर्यंत अंमलात आणणार, हे पुढील सुनावणीच्या वेळी स्पष्ट करण्याचे आदेश रेल्वे प्रशासनाला दिले.दरम्यान प्रवासादरम्यान विविध कारणांनी होणाऱ्या मृत्यूचा दर हा ३८.०८ टक्के असून तो न्यूयॉर्क (९.०८ टक्के), फ्रान्स (१.४५ टक्के) आणि लंडन (१.४३ टक्के) च्या तुलनेत कितीतरी पटीने अधिक आहे, अशी माहिती जाधव यांनी केलेल्या जनहित याचिकेच्या माध्यमातून पुढे आली होती. मध्य आणि पश्चिम रेल्वेनेही या जनहित याचिकेवर उत्तर दाखल केलं होतं. गेल्या २० वर्षांत उपनगरीय प्रवासादरम्यान ५१,८०२ हजारांहून अधिक प्रवाशांचा मृत्यू झाल्याची कबुली रेल्वेने दिली होती. २००५ पासून जुलै २०२४ पर्यंत पश्चिम रेल्वेवर २२,४८१ जणांना आपला जीव गमावला.

उपनगरीय रेल्वेतील प्रवाशांच्या मृत्यूसंदर्भात पालघरस्थित यतीन जाधव यांनी गेल्या वर्षी जनहित याचिका दाखल केली होती. त्यात, मुंबई उपनगरीय रेल्वे प्रवासादरम्यान होणाऱ्या मृत्युचा दर हा ३८.०८ टक्के असल्याचे म्हटले होते. जगात हा दर सर्वाधिक असल्याचा दावाही करण्यात आला होता. न्यायालयाने ही या याचिकेची आणि त्यात नमूद केलेल्या आकडेवारीची दखल घेऊन ही चिंताजनक बाब असल्याचे ताशेरे ओढले होते.

# थोडक्यात

## नायगांव येथे जनता दरबार संपन्न

**अक्षराज : विकास वाघ**



**दि.२२, धाराशिव :** कळंब तालुक्यातील नायगाव येथे नुकताच विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोकराव शिंदे तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ साळुंखे तसेच रामहरी शिंदे संजय बोंदर, संजय घोगरे, छाया बोंदर, किरण पाटील, उमाकांत गिराम, मतीन पटेल, फिरोज पठाण, बाळासाहेब सरवदे, नंदकुमार समुद्रे, लक्ष्मण देशमुख, किरण एडके,बालु आबा एडके, प्रल्हाद गिराम, बाळासाहेब राऊत,बद्रीनाथ धप्पाधुळे, आदी प्रमुख नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी विठ्ठल रखुमाईचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. येथे उपस्थित जिल्हा परिषद सर्कल मधील सर्व नागरिकांनी या जनता दरबार मध्ये आपल्या अनेक समस्या प्रमुख पाहुण्या समोर लेखी निवेदनाद्वारे दिल्या. यावेळी भाजपा सरकारचे यशस्वी ११ वर्षातील धोरण व योजनेची माहिती देऊन नागरिकांच्या सर्व समस्या जाणून घेऊन त्या आपण लवकरात लवकर सोडवण्यासाठी प्रयत्न करु असे बोलताना भाजपा तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ साळुंखे यांनी सांगितले. हा जनता दरबार सर्कल मधील अनेक अडचणी सोडविण्यासाठी असल्याने बरेच प्रश्न लवकरच मार्गी लागणार अशी आशा येथिल उपस्थित नागरिकांमध्ये दिसून येत होती. यावेळी उद्धवराव पाटील,माजी संचालक भरत पाटील, प्रल्हाद शितोळे, व्यंकट शितोळे, अनिल गोरे, विकास वाघ (कुलकर्णी), अभिजीत पाटील, हनुमंत लामतुरे तसेच नायगांव जिल्हा परिषद सर्कल येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शाळेवर कोसळला जुना वृक्ष; कोणतीही हानी नाही

**अक्षराज : रमेश पंडित**



**दि.२२, हिमायतनगर (नांदेड) :** हिमायतनगर येथील जिल्हा परिषद शाळेवर जुना आणि धोकादायक वृक्ष अचानक कोसळल्याने विद्यार्थ्यांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. सुदैवाने घटनेच्या वेळी वर्गात मुले नसल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र या प्रकारामुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच कामारी येथील ही शाळा १९३४ मधील बांधकाम निजाम कालीन असून शाळेच्या खोल्या ह्या अतिशय जीर्ण तसेच मोडकळीस आल्या आहेत.

कामारी येथील सुज्ञ पालकांनी अनेक वेळा या संदर्भात प्रशासनाशी निवेदन तथा तोंडी सूचना देऊन देखील याकडे लक्ष दिले जात नाही. सध्या वादळी वाऱ्यामुळे शाळेच्या वर्गखोल्यांची अवस्था देखील बिकट झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शाळेच्या परिसरात काही जुन्या झाडांची स्थिती तसेच मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या यांची अवस्था धोकादायक झाली होती. याबाबत शिक्षक व पालकांनी प्रशासनाला वारंवार सूचना दिल्या होत्या. मात्र योग्य ती कारवाई न झाल्यामुळे अखेर एक मोठा वृक्ष कोसळण्याची घटना घडली. ग्रामस्थांनी आणि पालकांनी यासंदर्भात संताप व्यक्त करत तातडीने परिसरातील धोकादायक वृक्ष तोडण्याची मागणी केली आहे. तसेच तात्काळ प्रशासनाने सदरील शाळेच्या वर्ग खोल्यांचे बांधकाम करून शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ही करण्यात येत आहे.

# योगाच्या माध्यमातून मानवाचा शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक संगम - पालकमंत्री डॉ. उईके

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** धावपळीच्या आणि तणावग्रस्त जीवनशैलीमुळे आज अनेकांना विविध व्याधींनी ग्रासले आहे. यावर मात करून निरोगी आणि उत्तम जीवन जगायचे असेल तर दैनंदिन जीवनात योगा करणे आवश्यक आहे. हा एक केवळ व्यायामच नाही तर योगामुळे मानवाचा शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक संगम साधण्यास मदत होते, असे विचार राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी व्यक्त केले.

जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मेरा युवा भारत आणि शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकूल येथे आयोजित मुख्य शासकीय योग दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, अतिरिक्त जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार, शिक्षणाधिकारी राजेश पातळे, अश्विनी सोनवणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिना साळूंके, सुभाष कासनगोट्टूवार आदी उपस्थित होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून संयुक्त राष्ट्र संघटनेने योगाचे महत्व ओळखले आणि २१ जूनला आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचा ठराव पारीत केला. गत ११ वर्षांपासून जगातील १७७ देशांमध्ये योग दिन साजरा केला जात आहे. 'एक पृथ्वी, एक आरोग्य' ही २०२५ च्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची थीम आहे. जिल्हा प्रशासनाने पतंजली योग समिती आणि विविध संघटनांच्या माध्यमातून चांगल्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

पुढील वर्षापासून सर्वांनी एकत्रित येऊन शासकीय योग दिन साजरा करावा. चंद्रपूरात योग संगम दिसणे आवश्यक आहे. पुढील आंतरराष्ट्रीय योग दिन यापेक्षा मोठ्या स्वरूपात व खुल्या मैदानात आयोजित करावा, अशा सुचनाही पालकमंत्री डॉ. उईके यांनी दिल्या. कार्यक्रमाच्या सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेला पुजन करण्यात आले.

यावेळी योगशिक्षिका वैजंती गौरकार आणि कविता मंघानी यांनी उपस्थितांना योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. कार्यक्रमाचे संचालन मंगला घोगी आसुटकर यांनी केले. कार्यक्रमाला क्रीडा अधिकारी मनोज पंधराम, मोरेश्वर गायकवाड, नंदू आवारे, तालुका क्रीडा अधिकारी विनोद ठिकरे, जयश्री देवकर, संदीप उईके, विजय ढोबाळे यांच्यासह पतंजली योग समितीचे इतर सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### चांगले व निरोगी आयुष्य योगामुळे शक्य : आमदार किशोर जोरगेवार

आज ११ वा आंतराष्ट्रीय योग दिन आपण साजरा करीत आहोत. देशाच्या पंतप्रधानांनी योगाचे महत्व जगाला पटवून दिले, त्यामुळेच याला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. अनादी कालापासून भारतात योग सुरू असून याला अनन्यसाधारण महत्व आहे. चांगले आयुष्य केवळ योगामुळेच मिळू शकते. कोणत्याही आजारावर नियंत्रण मिळवायचे असेल किंवा मनाच्या शांतीसाठी योगा करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. उपस्थितांनी केली ही आसने कपालभारती प्राणायाम, अनुलोमविलोम, ब्राभरी प्राणायाम, वज्रासन, स्कंदसंचालन, स्कंदस्थलांतरण, स्कंदचक्र, घुटनासंचालन, ताडासन, वृक्षासन, पादअष्टासन, अर्धचक्रासन, त्रिकोनासन, दंडासन, भद्रासन, वज्रासन, अर्धवज्रासन, उत्तंगासन, वक्रासन, भुजंगासन, अर्धहलासन, पवनउत्तासन, शवासन आदी आसने करण्यात आली.

## न्यू इंग्लिश हायस्कूल तथा क.महाविद्यालय पांढरकवडा येथे संरक्षण भिंतीचे भूमिपूजन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** द एज्युकेशन सोसायटी चंद्रपुरद्वारा संचालित न्यू इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय पांढरकवडा येथे प्राचार्या डॉ. शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २०जून २०२५ रोजी लॉयड्स इनफिनाइट फाऊंडेशन व लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आनंदो शाळा सक्षमीकरण अंतर्गत शाळेच्या सभोवताली फेंसी संरक्षण भिंतीचे काम सुरू करण्यासाठी संस्थेचे सचिव रामदास वागदरकर यांच्या हस्ते भूमिपूजन पुजा, नारळ फोडून व कुदळ मारून भूमिपूजन करण्यात आले. प्राचार्या डॉ.शुक्ला, सुरजभाऊ तोतडे (माजी सरपंच ग्रामपंचायत पांढरकवडा), श्री.भोयर (समन्वयक लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट), श्री काकडे बाबूजी (सेवानिवृत्त लिपीक) सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते फेंसी संरक्षण भिंतीचे भूमिपूजन करण्यात आले. या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# वासुंदे परिसरातील आदिवासी समाजाला जातीचे दाखले

## सुजित झावरे पाटील यांचा अभिनव उपक्रम

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** डोंगर दर्याखोर्यात अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या आदिवासी समाज तहसील कार्यालयात हेलपाटे मारून ही जातीचे दाखले न मिळाल्याने नाउमेद झालेल्या वासुंदे परिसरातील ठाकरवाडी येथे रविवार, दिनांक २२ जून २०२५ रोजी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या संकल्पनेतून व देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून आदिवासी समाज बांधवांसाठी मोफत जातीचे दाखला शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात ५०० पेक्षा अधिक आदिवासी समाज बांधवांनी उपस्थित राहून अर्ज सादर केले.

सुजित झावरे यांच्या या अभिनव उपक्रमाला परिसरातील नागरिकांनी भरघोस प्रतिसाद मिळाला. जातीचे दाखले नसल्याने शासनाच्या शैक्षणिक योजनांपासून ठाकरवाडी येथील आदिवासी समाज वर्षानुवर्षे महत्त्वाच्या दस्तऐवजांपासून वंचित राहिले होते.याची दखल सुजित झावरे व देवकृपा फाऊंडेशने घेतली. शिबिराच्या माध्यमातून अनेक आदिवासी कुटुंबांना शासनाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आदिवासी बांधवांना दाखले देण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२१, कुंडलवाडी (नांदेड) :** प्राथमिक आरोग्य केंद्र, कुंडलवाडी यांच्या सौजन्याने आणि डॉ.गणपत वाडेकर तालुका आरोग्य अधिकारी,बिलोली यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच डॉ. सारिका अनमुलवाड वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र, कुंडलवाडी यांच्या नियोजनात शालेय विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त निबंध स्पर्धेचे तसेच योग सत्राचे,योग व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. निबंध स्पर्धेचा विषय करो योग, रहो निरोग या विषयावर विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. योगसत्र व निबंध स्पर्धेत एकूण ७६ स्पर्धक सहभागी झाले.

सर्व सहभाग विद्यार्थ्यांना तसेच शालेय मार्गदर्शक शिक्षकांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आली. योगाच्या शारीरिक व मानसिक फायद्यांविषयी विद्यार्थ्यांनी सखोल विचार मांडले. कार्यक्रमात डॉ.नरेश देविदास बोधनकर यांनी मानसिक तणावापासून मुक्ती - योग या विषयावर विद्यार्थ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी वैद्यकीय अधिकारी डॉ.सारिका अनमुलवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले व विजेत्या विद्यार्थ्यांना लवकरच बक्षीस वितरण करण्यात येईल, असे जाहीर केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये योगा बद्दलची जागरूकता वाढीस लागली असून योग हा आयुष्याचा एक आवश्यक भाग आहे हे अधोरेखित झाले.

## अरुणभाऊ झाडे विद्यालयात योग दिन संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२१, चंद्रपूर :** केंद्र सरकारच्या निर्देशानुसार नांदेड येथील अरुणभाऊ झाडे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात योग दिन साजरा करण्यात आला. २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपूर्ण जगात साजरा करण्यात येतो. सर्वांचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक निरोगीपणा सुदृढ ठेवण्यासाठी योगाचे महत्व आणि योगदान याबाबतीत समजून सांगणे तसेच लोकांना नियमित योग करण्यासाठी प्रेरित करणे हे आंतराष्ट्रीय योगदिनाचे उद्दिष्ट आहे. योग दिनाच्या निमित्याने योगशिक्षक मेश्राम यानी सर्वांना योग आणि प्राणायाम करून दाखविले आणि सर्वानी ते उस्फुर्तपणे केले. याप्रसंगी ग्रा.पं.नांदेडचे सरपंच मुरलीधरजी गौरकर यांची विशेष उपस्थिती होती. तसेच प्राचार्य अरविंद राऊत, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.